१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील कार्यात्मक अनुदान वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एफएफसी-२०१८/प्र.क्र.१४५/नवि-४
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- २७ ऑगस्ट,२०१९

वाचा :-

१) केंद्र शासनाचे क्रमांक एफ.१३(०१) /एफएफसी/एफसीडी /२०१५-१६, दिनांक २३.०८.२०१९चे पत्र

२) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. टिएफसी ८०१५/ प्र.क्र. १०६/ नवि-४, दिनांक ३.८.२०१५

३) शासन निर्णय,नगर विकास विभाग क्र.एफएफसी ८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४,दिनांक १८.२.२०१६

४) शासन निर्णय ,नगर विकास विभाग क्र. एफएफसी १९१७/ प्र.क्र. ४/ नवि-४, दिनांक २.३.२०१७

प्रस्तावना :-

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यासाठी सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचा कार्यात्मक अनुदान रुपये ५५०.९१ कोटी संदर्भाधीन अ.क्र. (१) येथील आदेशान्वये केंद्र शासनाने मुक्त केले आहेत. सदर अनुदान राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून संदर्भाधीन अ.क्र. (१) येथील आदेशान्वये मुक्त करण्यात आलेला सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील कार्यात्मक अनुदानापोटी रु. ५५०.९१ कोटी इतका निधी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे आहरीत करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. **सदर निधीचा विनियोग संदर्भाधीन क्र. (२), (३) व (४) येथील शासन निर्णयात नमूद केलेली तसेच याबाबत स्वतंत्र आदेशाद्वारे विहित करण्यात येणारी कार्यपद्धती विचारात घेण्यात यावी.**

२. सदर रु. ५५०.९१ कोटी इतकी रक्कम आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. **सदर निधीच्या स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय वितरणाबाबत सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे.**

३. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कार्यात्मक अनुदानाच्या रकमेचे विहित नमुन्यातील विनियोग प्रमाणपत्र तात्काळ आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी शासनाकडे सादर करावे. सदर अनुदानातून खर्च करताना शासन निर्गमित करेल अशा शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार करणे बंधनकारक राहील. सदरचे अनुदान **"सशर्त"** म्हणून वितरीत करण्यात येत आहे.

४. १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार **सन २०१७-२०१८ करिता कार्यात्मक अनुदान** प्राप्त झालेले असून सदरचा खर्च हा "मागणी क्र.एफ-२,२२१७ नगर विकास, ८००, इतर खर्च ,(००)(०३) चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सहायक अनुदान (कें.पु.यो.) (अनिवार्य), (२२१७ ९७४१) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशिर्षांतर्गत सन २०१९-२०२० या चालू वित्तीय वर्षाकरीता उपलब्ध असणा-या तरतूदीमधून खर्ची घालण्यांत यावा.

५. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना नियंत्रक अधिकारी तसेच संबंधित सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदरहू शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ३६/२०१९/विआक, दिनांक २६.०८.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२७१४४८५५५४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sharad Kirwale

Digitally signed by Sharad Kirwale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7ed23302d612eecfa1f6e35cc7ef096ce9dc6a6c617b767e8f74743b779e2b96, cn=Sharad Kirwale
Date: 2019.08.27 16:04:33 +05'30'

(शरद किरवले)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त व संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

६. महालेखापाल कार्यालय, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. आयुक्त, सर्व संबंधीत महानगरपालिका
११. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. प्रधान सचिव, नगर विकास-१ विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव,नगर विकास-२, यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
१५. निवडनस्ती, नवि-४ कार्यासन , नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

****